महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

E-mail ID:- nitin.pawar69@nic.in
दूरध्वनी क्र.:- ०२२ २२०१७१०३

क्र. संकीर्ण - २०२१/प्र.क्र.२२४/आस्था-१२
दिनांक :- ८ फेब्रुवारी, २०२२

खाते साप्र आस्था १५
दिनांक 22 MAR 2022
उप मु.का.अ.(सा.)
अति.मु.का.अ.
मु.का.अ.
1489

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.

विषय - अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरीता आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के या पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत

संदर्भ - आपले पत्र क्र. साप्र/आस्था-१७/१३९८/२०२१, दि.१३.८.२०२१ व दिनांक २८.९.२०२१ चे स्मरणपत्र

महोदय,

आरोग्य सेवक (पुरुष) ५० % या पदासाठी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण व राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी फवारणी कामाचा ९० दिवसांचा अनुभव आवश्यक आहे. परंतु, सद्यःस्थितीत राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रम बंद असल्यामुळे हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांची भरती बंद असल्याबाबत जिल्हा हिवताप कार्यालयाने कळविलेले आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत आरोग्य सेवक (पुरूष) ५० % या पदाकरीता अनुकंपा प्रतिक्षासूचीमधील उमेदवारांकडे सदर अनुभवाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे अनुकंपा प्रतिक्षासूचीमधील प्रलंबित राहिलेल्या पात्र उमेदवारांना सदर अनुभवाच्या अटीमधून सवलत मिळण्याची संदर्भाधिन पत्रान्वये विनंती केली आहे.

२. यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवक (पुरुष) गट क या पदाचे सेवा प्रवेश नियम दि. २९.९.२०२१ च्या अधिसूचनेन्वये सुधारित करण्यात आले आहेत. सदर सुधारीत सेवा प्रवेश नियामामध्ये ९० दिवसाचा हंगामी फवारणी कामाचा अनुभव असणे हि अट समाविष्ट करण्यात आलेली नाही. (प्रत सोबत)

३. या विभागाने शासन अधिसूचना क्रमांक सेप्रनि-२००२/प्र.क्र.३८६/आस्था-९, दिनांक ४.६.२००३ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (सुधारणा) अधिनियम, नियम २००३ राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत. (प्रत सोबत) त्यानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ च्या परिशिष्ट पाच-अ मधील जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) श्रेणी तीन मधील अनुक्रमांक तीन येथील आरोग्य सेवक (पुरूष) या पदावरील नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे आहे:-

(ब) पुढील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने,--

(एक) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नसेल,

आणि

(दोन) जे विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण आहेत.

परंतु राष्ट्रीय मलेरीया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून नव्वद दिवसांचा अनुभव धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

४. ग्रामविकास विभागाचे दिनांक ४.६.२००३ च्या सुधारीत सेवाप्रवेश नियम स्वयंस्पष्ट असून सदर नियमानुसार राष्ट्रीय मलेरीया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून नव्वद दिवसांचा अनुभव अनिवार्य नसून असा अनुभव धारकांना प्राधान्य देण्यात यावे, अशी तरतूद आहे.

५. सद्य:स्थितीत राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध प्रशिक्षण कार्यक्रम बंद असल्यामुळे जिल्हा हिवताप कार्यालयात हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांची भरती बंद असल्यामुळे असे प्रशिक्षण घेतलेले उमेदवार उपलब्ध होणार नाहीत. परिणामी अशा उमेदवारांना प्राधान्य देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अत:एव, राष्ट्रीय मलेरीया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून ९० दिवसांचा अनुभव धारकांना प्राधान्य देण्याची तरतदू आहे. त्यामुळे असे उमेदवार असल्याच प्राधान्य देता येईल. परंतु जर असे उमेदवार उपलब्ध नसतील तरीसुद्धा वरील परि-३ मध्ये नमूद सेवा प्रवेश नियमांतील नियम (ब) (एक) व (दोन) मध्ये नमूद शैक्षणिक अर्हता धारणा करण्याऱ्या उमेदवारांतून पद भरती करता येईल. आपल्या पत्रातील विनंतीप्रमाणे अनुभवाची अट शिथील करण्याची आवश्यकता नाही.

आपला

(का.गो.वळवी)
उप सचिव (जि.प. आस्थापना)

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)